आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

४ जुलै २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाला देशभरात प्रारंभ
- मणिपूरमधली परिस्थिती निवळण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं राज्यसभेत प्रतिपादन
- महाराष्ट्रात वाचन चळवळीला चालना देण्यासाठी नव्यानं सहा ते सात हजार ग्रंथालयं सुरु करण्याची उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्र्यांची विधानपरिषदेत घोषणा
- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वविजेत्या संघाला प्रधानमंत्र्यांची शाबासकी/ संघाचा विजयोत्सव आज मुंबईत साजरा होणार

**आणि**

- गाझा पट्टीत युद्धसमाप्तीच्या उद्देशाने हमासची इजिप्त आणि कतारच्या मध्यस्थांशी सल्लामसलत

**<><><><><>**

नीती आयोग ४ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान संपूर्णता अभियान राबवणार आहे. या अभियानात देशातल्या ५०० तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानामार्फत गरोदर मातांची तपासणी, उच्च रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, गरोदर मातांना पोषण आहार, मृदा आरोग्य पत्रिका आणि स्वयंसहाय्यता गटांना खेळतं भांडवल देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात अमरावती, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, जालना, नंदुरबार, हिंगोली, नाशिक, धाराशिव, पालघर, सोलापूर, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांचा या अभियानात समावेश झाला आहे.

यवतमाळ जिल्ह्यातल्या झरी जामणी या आकांक्षित तालुक्यात आज नीती आयोगाच्या संपूर्णता अभियानाचं उद्घाटन करण्यात आलं. आरोग्य आणि पोषण या क्षेत्रात सर्वांनी एकत्र येऊन काम करावं अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी यावेळी दिल्या. या क्षेत्रात काम करणाऱ्या आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि एएनएम यांच्या कामाचं जिल्हाधिकाऱ्यांनी कौतुक केलं. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसह उपस्थितांनी आकांक्षित तालुक्याला सक्षम आणि समृद्ध करण्याची प्रतिज्ञा केली.

<><><><><>

मणिपूरमधली परिस्थिती निवळण्यासाठी सरकार सातत्याने प्रयत्न करत असल्याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाबद्द्ल आभार प्रस्तावाला राज्यसभेत उत्तर देताना “मणिपूरमध्ये शांतता आणि सौहार्द सुनिश्चित करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार सर्व संबंधितांशी चर्चा करत असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. मणिपूरमध्ये राहून स्वतः गृहमंत्र्यांनी शांततेसाठीच्या वाटाघाटी घडवून आणल्या. मणिपूरमधे हिंसाचाराच्या घटना सातत्याने कमी होत असल्याचं सत्य आपण मान्य केलं पाहिजे यावर मोदी यांनी भर दिला. मणिपूरमध्ये शाळा, महाविद्यालयं, कार्यालयं आणि इतर संस्था नेहमीप्रमाणे सुरू असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली. प्रधानमंत्री हे बोलत असतानाच  काँग्रेस, द्रमुक, टीएमसी, आम आदमी पार्टी, आरजेडी, डावे

आणि इतर विरोधी पक्ष सदस्यांनी गदारोळ केला. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांना आपल्या जागी जाऊन बसण्याची विनंती केली. त्यानंतर विरोधी पक्षांनी सभात्याग केला. विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरं ऐकण्याचं धाडस विरोधकांमध्ये नाही. सभात्याग करणं हा सभागृहाचा अपमान आहे. अशी प्रतिक्रीया विरोधकांच्या सभात्यागावर प्रधानमंत्र्यांनी दिली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत केलेल्या अभिभाषणाबद्दल सभागृहाने धन्यवाद प्रस्ताव मंजूर केल्यावर राज्यसभेचं कामकाज काल अनिश्चित काळासाठी संस्थगित करण्यात आलं

**<><><><><>**

महाराष्ट्रात, आगामी राज्य विधानसभा निवडणुकांच्या आधी, निवडणूक आयोगानं मतदार याद्यांची विशेष सारांश उजळणी जाहीर केली आहे. याअंतर्गत, मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये मतदान केंद्रं स्थापन करण्यावर निवडणूक आयोगाचा भर राहील. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष आणि सचिवांना बूथ-स्तरीय स्वयंसेवक म्हणून नियुक्त करण्यात येईल. या स्वयंसेवकांना पात्र मतदारांची नावे अद्ययावत करण्याचे आणि सोसायटी सोडून गेलेल्या किंवा सोसायटीतील मृत व्यक्तींची नावे काढून टाकण्याचे काम दिले जाईल. गृहनिर्माम सोसायटीमध्ये बूथ स्थापन करण्यासाठी, सोसायटीने जवळच्या बूथ स्तरीय अधिकाऱ्याशी संपर्क साधणे आवश्यक आहे. सोसायटी Google फॉर्मद्वारे निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज देखील सादर करू शकते. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी गृहनिर्माण

सोसायट्यांना मतदारांसाठी सोयीस्कर आणि जवळच्या ठिकाणी मतदान केंद्र स्थापन करण्यासाठी पावलं उचलण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात वाचन चळवळीला चालना देण्यासाठी शासन अनुदानित सुमारे साडे अकरा हजार ग्रंथालयं असून नव्यानं सहा ते सात हजार ग्रंथालयं सुरु करण्यात येतील, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानपरिषदेत दिली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अरुण लाड यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तासाच्या चर्चेला ते उत्तर देत होते.

यानुसार ३ हजार लोकसंख्येच्या प्रत्येक गावात तसंच ५०० लोकसंख्येच्या आदिवासी बहुल गावात ग्रंथालय अनिवार्य होणार आहे, असं त्यांनी सांगितलं. त्याचप्रमाणे ग्रंथालयांना सध्याच्या ६० टक्के अनुदानात ४० टक्के वाढ केली जाईल तसंच ग्रंथालयांची दर्जोन्नती करण्यासाठी सॉफ्टवेअर विकसित करून ग्रंथालयांकडून ऑनलाईन माहिती मागवली जाईल, असं चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं.

राज्य पोलीस दलात कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेली पदं ही तांत्रिक आहेत. एकीकडे ही तात्पुरती भरती ११ महिन्यांसाठी करत असतानाच दुसरीकडे ८१ पदांच्या नियमित भरतीच्या प्रक्रियेला मान्यता देण्यात आली आहे, उर्वरित पदांच्या भरतीची प्रक्रियाही सुरू आहे, असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत दिलं. आमदार रमेश पाटील यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला ते उत्तर देत होते.

**<><><><><>**

आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी केलेलं निलंबन तीन दिवसांवर आणण्याचा प्रस्ताव विधानपरिषदेेने आज एकमताने मंजूर केला. संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा प्रस्ताव मांडल्यावर आवाजी मतदानाने तो मंजूर करण्यात आला.

<><><><><>

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा अधिनियम आणि भारतीय साक्ष्य अधिनियम या नुकत्याच लागू झालेल्या तीन नव्या फौजदारी कायद्यांच्या अनुषंगानं पत्र सूचना कार्यालयानं आज मुंबईत एका विशेष वार्तालाप कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीचे उपसंचालक डॉ. काकासाहेब डोळे उपस्थित होते.

नव्या फौजदारी कायद्यांमुळे वेळेत न्याय मिळण्याची प्रक्रिया सुलभ होणार आहे. नवे कायदे हे शिक्षेऐवजी न्यायकेंद्रित आहेत. तसंच यांमुळे पीडित आणि तक्रारदारांना तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं आपली तक्रार आणि जबाब नोंदवता येतील. तक्रारीनंतर संपूर्ण तपासाचं चित्रण करणं आणि ९० दिवसांत तपासाचा अहवाल सादर करणं पोलिसांसाठी बंधनकारक असेल. सात वर्षांवरच्या शिक्षेची तरतूद असणाऱ्या गुन्ह्यांत न्यायवैद्यकीय तपास अनिवार्य असेल, असं डॉ. डोळे यावेळी म्हणाले.

<><><><><>

टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक जिंकून आज बार्बाडोसहून मायदेशी परतलेल्या भारतीय संघानं दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली.  प्रधानमंत्र्यांनी क्रिकेट संघाला शाबासकी दिली

आणि संपूर्ण देशाला त्यांचा अभिमान वाटत असल्याचं सांगितलं. केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी नवी दिल्ली विमानतळावर विश्वविजेत्या संघाचं स्वागत केलं. मोठा जनसमुदाय विमानतळाबाहेर उपस्थित होता. वादळी हवामानामुळे संघाला बार्बाडोसमध्ये अडकून पडावं लागलं होतं.

क्रिकेटपटूंचं दुपारी मुंबईत आगमन होणार असून संध्याकाळी मरीन ड्राईव्हवर एका शोभायात्रेत सहभागी होऊन ते क्रिकेटरसिकांची मानवंदना स्वीकारतील. शोभायात्रेला ५ वाजता एन सी पी एपासून सुरुवात होईल. त्यानंतर संध्याकाळी ७ वाजता वानखेडे स्टेडिअमवर त्यांचा सत्कार होणार आहे. टीम इंडियाला बी सी सी आय कडून सव्वाशे कोटी रुपयांचा धनादेश दिला जाणार आहे.

या सर्व कार्यक्रमाला होणारी गर्दी लक्षात घेऊन सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. एन सी पी ए ते मेघदूत पुलापर्यंतचा मार्ग वाहनांना फिरण्यास तसंच पार्किंग करण्यास बंद राहील. वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करावा, असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**<><><><><>**

गाझा पट्टीत इस्राएलबरोबरचं युद्ध संपवण्याच्या दृष्टीनं कतार आणि इजिप्तच्या मध्यस्थांसोबत सल्लामसलत केल्याचं हमासनं म्हटलं आहे. हमासचा प्रतिसाद मध्यस्थांमार्फत पोहोचल्याच्या वृत्ताला इस्राएलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी दुजोरा दिला आहे. या प्रतिसादाचा अभ्यास करून इस्राएल निर्णय घेईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

देशाच्या वायव्य आणि मध्य भागात पुढच्या चार दिवसात मेघ गर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. जम्मू काश्मीर, लडाख, गिलगीट, बाल्टीस्तान, मुझ्झफराबाद यासह हिमाचल प्रदेश, हरियाणा, मध्यप्रदेश आणि पंजाबमध्ये आज जोरदार पाऊस पडेल असं हवामान विभागानं कळवलं आहे. तर उत्तर प्रदेश, उत्तराखंड, आसामा आणि मेघालयमध्ये आज अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//